StudentBounty.com

Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र.

**F**

# Paper-II
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

   (Name) ..........................................

2. (Signature) ..........................................

   (Name) ..........................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..................................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## DEC - 01213

**Time Allowed : 1¼ Hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **12** Number of Questions in this Booklet : **50**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **50** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-II will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **50** बहुपर्याय प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

www.StudentBounty.com

www.StudentBounty.com

StudentBounty.com

DEC - 01213/II

# MARATHI

## Paper II

# मराठी

## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**सूचना** : या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. भाषा सतत बदलत असते, हे तत्त्व मूलभूत मानल्यास भाषाभ्यासात कोणती अडचण येत **नाही** ?

   (A) जनकभाषा किंवा आदिभाषा यांचे स्वरूप निश्चित करता न येण्याची

   (B) भाषिक परिवर्तनाचा विचार केंद्रवर्ती राहातो हे स्वीकारण्याची

   (C) आदिभाषा एकजिनसी मानावी लागण्याची

   (D) परिवर्तनाचे नियम हाती न लागण्याची

2. शौरसेनी आणि महाराष्ट्री या समकालीन असून भिन्न प्रदेशांत बोलल्या जात होत्या, असे मानणे साधार नसून कालदृष्ट्या शौरसेनी हे आधीचे तर महाराष्ट्री हे नंतरचे रूप आहे, हे कोणी स्पष्ट केले ?

   (A) पां. दा. गुणे

   (B) सु. मं. कत्रे

   (C) ना. गो. कालेलकर

   (D) अ. का. प्रियोळकर

3. पूरक विनियोग, व्यवच्छेदक विनियोग, वैकल्पिक विनियोग या तत्त्वांच्या आधारे कशाची निश्चिती करता येते ?

   (A) स्वनिमाची

   (B) पदिमाची

   (C) योगात्मक प्रक्रियेची

   (D) पदबंधाची

4. लीळाचरित्र, गोविंदप्रभुचरित्र यांसारख्या ग्रंथांच्या भाषेशी असणारे नाते स्पष्ट करून वऱ्हाडी मराठी ही एकीकडून अंशत: प्राचीन व आद्य मराठी, तर दुसरीकडून आधुनिक मराठीपासून व व्याकरणमान्यतेपासून दूर असलेली महाराष्ट्रातील बोली आहे, हे विधान कोणाचे ?

   (A) ह. ना. नेने

   (B) वि. भि. कोलते

   (C) सु. म. डोळके

   (D) सु. बा. कुलकर्णी



www.StudentBounty.com

StudentBounty.com



5. "त्याने हातावर तुरी दिली, नाव किनाऱ्याला लागली, हा रस्ता मोठ्या रस्त्याला मिळतो" या वाक्यांतील 'हातावर', 'किनाऱ्याला', 'मोठ्या रस्त्याला' हे शब्द कोणत्या प्रकारात मोडतात ?
   - (A) कर्मपूरके
   - (B) आधारपूरके
   - (C) विधिपूरके
   - (D) उद्देश्यविस्तारक

6. ऐतिहासिकता, प्रामाण्य, जिवंतपणा आणि स्वायत्तता ही कोणत्या प्रकारच्या भाषेची सारतत्त्वे आहेत ?
   - (A) बोलीभाषा
   - (B) पोटभाषा
   - (C) प्रमाणभाषा
   - (D) मिश्रभाषा

7. जाँबाज > जहाँबाज, अक्ल > अक्कल, आबरू > अब्रू अशारीतीने उच्चारणाच्या बाबतीत मराठीने अनेक फारसी शब्दांना आपल्या स्वनिमव्यवस्थेनुसार बदलून घेतले आहे हे सुव्यवस्थितपणे कोणी दाखवले आहे ?
   - (A) मा. त्र्यं. पटवर्धन
   - (B) वि. दा. सावरकर
   - (C) श्री. के. क्षीरसागर
   - (D) सेतुमाधवराव पगडी

8. सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी । करि डळमळ भूमंडळ सिंधू जळ गगनी ॥ अशा प्रकारचा 'ण' व 'ळ' यांचा वैपुल्याने होणारा वापर हा कोणत्या भाषेचा मराठीवरील परिणाम आहे ?
   - (A) संस्कृत
   - (B) कन्नड
   - (C) तेलुगू
   - (D) तमिळ

9. 'चक्रपाणी वटेश्वर' आणि 'चांगा वटेस्वरा' चा उल्लेख कोणत्या शिलालेखात आहे ?
   - (A) हरिश्चंद्रगड येथील शिलालेख
   - (B) नागाव शिलालेख
   - (C) मठगावचा शिलालेख
   - (D) पळसदेव शिलालेख

10. 'श्री चक्रधरनिरूपित श्रीकृष्ण चरित्रां'चे संपादन पुढीलपैकी कोणी केले **नाही** ?
    - (A) भीमराव कुलकर्णी
    - (B) व. वि. पारखे
    - (C) वि. भि. कोलते
    - (D) शं. गो. तुळपुळे

11. "श्रोतेयाचे मन आधीच सचाड । वरी मऱ्हाटीया पुरवीन कोड" :
    - (A) केशिराज व्यास
    - (B) ज्ञानेश्वर
    - (C) रामदास
    - (D) तुकाराम



www.StudentBounty.com

StudentBounty.com



12. पुढील जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | रत्नकलाचरित्र | (5) | कृष्ण याज्ञवल्की |
| (2) | कथाकल्पतरू | (6) | रंगनाथ मोगरेकर |
| (3) | बालबोध | (7) | लोलिंबराज |
| (4) | पंचरत्नटीका | (8) | उद्धव चिद्धन |
| | | (9) | त्र्यंबकराज |

(A) 1—5, 2—9, 3—6, 4—7

(B) 1—7, 2—5, 3—9, 4—6

(C) 1—6, 2—8, 3—5, 4—9

(D) 1—8, 2—7, 3—9, 4—5

13. पुढील बखरी कालक्रमानुसार लावा :

(1) चित्रगुप्ती बखर

(2) राक्षसतागडीची बखर

(3) हरिवंशाची बखर

(4) पेशव्यांची बखर

(A) (4)—(3)—(1)—(2)

(B) (3)—(4)—(2)—(1)

(C) (2)—(1)—(4)—(3)

(D) (2)—(1)—(3)—(4)

14. शाहिरी वाङ्मयाने आपल्या शृंगारभावनेचा आविष्कारही सरळ व प्रत्यक्षपणे केला आहे. त्याकरिता पौराणिक कथांचा आश्रय घेतला **नाही**.

(A) संपूर्ण विधान चूक आहे

(B) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

(C) संपूर्ण विधान बरोबर आहे

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

15. 'प्रभुलिंगलीले' या कानडी काव्याचा 'लीलाविश्वंभर' हा अनुवाद कोणी केला ?

(A) ब्रह्मदास

(B) वीरदास

(C) शंकरदास

(D) माधवदास

16. 'विव्हावो स्वीकारू' या लीळेशी संबंधित ग्रंथ कोणता ?

(A) रुक्मिणि-स्वयंवर

(B) धवळे

(C) शिशुपालवध

(D) मातृकी रुक्मिणि-स्वयंवर

17. 17व्या शतकात संस्कृतमधून तेलुगूमध्ये प्रथमच आढळलेल्या, मराठी अनुवाद ग्रंथाचे नाव काय ?

(A) ज्ञानवैकल्य

(B) सुगमबोध

(C) पंचीकृत विवेक

(D) विवेकसार ऊर्फ मननग्रंथ

18. रंगबोधांची 'योगवासिष्ठटीका' ही बृहद्योग-वासिष्ठावरील टीका नाही, ती लघुयोग-वासिष्ठावरची टीका आहे :

(A) संपूर्ण विधान चूक आहे

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) संपूर्ण विधान बरोबर आहे

(D) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक



www.StudentBounty.com

StudentBounty.com



19. 'घडि घडि घडि चरण तुझे आठवतीं रामा', ही पदरचना कोणत्या कवीची आहे ?
    (A) केशवस्वामी
    (B) आनंदतनय
    (C) विठ्ठल बीडकर
    (D) रघुनाथ पंडित

20. विष्णू सखाराम खांडेकरांनी इसापनीती व पंचतंत्र या कथालेखनाच्या पद्धतीस निकट जाणारी नीतिकथा तसेच खलिल जिब्रानच्या रूपककथेजवळ जाणारी रूपककथा लिहिली त्यामुळे प्रथमच नवी भर मराठी कथावाङ्मयात पडली.
    (A) विधानाचा पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
    (B) विधानाचा पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
    (C) संपूर्ण विधान बरोबर
    (D) संपूर्ण विधान चूक

21. पुढीलपैकी कोणत्या कादंबरीला साहित्य अकादेमीने गौरविण्यात आले ?
    (A) चौंडकं
    (B) झेलझपाट
    (C) राघववेळ
    (D) दशक्रिया

22. पुढील पद्यपंक्तींपैकी मूळ पद्यपंक्ती कोणती ?
    (A) "पिपांत मेले ओल्या उंदीर"
    (B) "उंदीर पिपांत मेले ओल्या"
    (C) "ओल्या पिपांत उंदीर मेले"
    (D) "उंदीर मेले पिपांत ओल्या"

23. 'गझल' हा कविताप्रकार मराठीत सर्वांत आधी कोणी हाताळला ?
    (A) माधव जूलियन
    (B) सुरेश भट
    (C) अमृतराय
    (D) मंगेश पाडगावकर

24. 'आमची देशी भाषा विद्यापिठी शोभणारी आहे की नाही', ह्या विषयावर इ.स. 1892 मध्ये कोणी सडेतोड विचार व्यक्त केले ?
    (A) अच्युत बळवंत कोल्हटकर
    (B) महादेव गोविंद रानडे
    (C) शिवराम महादेव परांजपे
    (D) राजारामशास्त्री भागवत

25. 'अगस्तीच्या अंगणात' या प्रवासवर्णनाचा लेखक कोण ?
    (A) मीना प्रभू
    (B) प्रभाकर पाध्ये
    (C) गंगाधर गाडगीळ
    (D) पु. ल. देशपांडे

26. पुढीलपैकी कोणाविषयीचे लेखन केवळ चरित्र स्वरूपातच सिद्ध झाले आहे ?
    (A) दादोबा पांडुरंग तर्खडकर
    (B) महर्षि धोंडो केशव कर्वे
    (C) भाऊ दाजी लाड
    (D) काशिबाई कानिटकर



www.StudentBounty.com

StudentBounty.com



27. 'बालचंद्र' या विज्ञानकथासंग्रहाचा लेखक कोण ?

(A) द. पां. खांबेटे

(B) श्री. बा. रानडे

(C) दि. बा. मोकाशी

(D) भा. रा. भागवत

28. 'ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण' ही भाषाविषयक रचना कोणी केली ?

(A) रा. भि. जोशी

(B) वि. का. राजवाडे

(C) कृष्णशास्त्री राजवाडे

(D) अहिताग्नी राजवाडे

29. पुढीलपैकी कोण 'नवभारत' मासिकाचे संपादक नव्हते ?

(A) मे. पुं. रेगे

(B) लक्ष्मणशास्त्री जोशी

(C) वसंत पळशीकर

(D) दि. के. बेडेकर

30. मराठी नाटके व त्यांच्या मूळ नाट्यकृती यांच्या जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (1) वेषविभ्रम | (5) आवर टाऊन |
| (2) सा रम्या नगरी | (6) यार्मा |
| (3) चांगुणा | (7) ट्वेल्फ नाईट ऑर वॉट यू वील |
| (4) चंद्र नभीचा ढळला | (8) सिटी लाईटस् |
| | (9) कॅलिग्युला |

(A) 1—5, 2—7, 3—9, 4—6

(B) 1—7, 2—5, 3—6, 4—9

(C) 1—9, 2—7, 3—5, 4—8

(D) 1—7, 2—5, 3—6, 4—8

31. रवीन्द्रनाथांच्या काव्याचा 'रवीन्द्र-वीणा' हा अनुवाद कोणी केला ?

(A) भा. वि. वरेरकर

(B) शं. बा. शास्त्री

(C) काकासाहेब कालेलकर

(D) श्रीपाद जोशी

32. सरव्हँटिसच्या 'डॉन क्विक्झोट' चा दोन भागांत मराठी अनुवाद कोणी केला ?

(A) पंडित आवळीकर

(B) तारा पंडित

(C) स. ह. मोडक

(D) दा. न. शिखरे



www.StudentBounty.com

StudentBounty.com



33. 'व्यक्तिगत नेणीव' व 'सामूहिक नेणीव' यांतील भेद कोणी केला आहे ?
   (A) सिग्मंड फ्रॉईड
   (B) एरिक नायमॉन
   (C) सी. जी. युंग
   (D) मॉड बॉडकिन

34. 'वस्तुनिष्ठ समरूपा'ची कल्पना कोणी मांडली आहे ?
   (A) टी. एस्. एलियट
   (B) सुझन लँगर
   (C) रोमान याकबसन
   (D) क्लीअन्थ ब्रुक्स

35. संकल्पना/सिद्धान्त आणि साहित्यमीमांसक यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | भावनासंक्रमण | (5) | आर. सी. रॅन्सम |
| (2) | भावलेली संगती | (6) | जोनाथन कलर |
| (3) | साहित्यिक क्षमता | (7) | आय. ए. रिचर्डस् |
| (4) | प्रेरणा संतुलन | (8) | काण्ट |
| | | (9) | टॉल्स्टाय |

   (A) 1–9, 2–6, 3–8, 4–7
   (B) 1–9, 2–8, 3–6, 4–7
   (C) 1–8, 2–9, 3–6, 4–7
   (D) 1–9, 2–8, 3–7, 4–6

36. 'दर्शना' व 'वर्णना' हा भेद कोणी केला आहे ?
   (A) महिमभट्ट
   (B) भट्टतौत
   (C) राजशेखर
   (D) कुंतक

37. संकल्पना/सिद्धान्त आणि साहित्यमीमांसक यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | साधारणीकरण | (5) | भट्टलोल्लट |
| (2) | अनुकरण | (6) | क्षेमेन्द्र |
| (3) | ध्वनी | (7) | आनन्दवर्धन |
| (4) | उपचितिवाद | (8) | शंकुक |
| | | (9) | अभिनव गुप्त |

   (A) 1–9, 2–8, 3–5, 4–7
   (B) 1–9, 2–5, 3–6, 4–7
   (C) 1–9, 2–8, 3–7, 4–5
   (D) 1–9, 2–6, 3–7, 4–8

38. व्यक्तिनिरपेक्ष काव्याची कल्पना कोणी मांडली ?
   (A) टी. इ. ह्यूम
   (B) एझ्रा पाऊण्ड
   (C) टी. एस्. एलियट
   (D) विलियम एम्पसन्



www.StudentBounty.com

StudentBounty.com



39. साहित्याचे काळावर अधिष्ठित वर्गीकरण कोणी केले आहे ?

(A) सुझर लँगर

(B) ॲरिस्टॉटल

(C) हेगेल

(D) टी. एस्. एलियट

40. संकल्पना/सिद्धान्त यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| (1) लयसिद्धान्त | (5) सृष्टी, सौंदर्य आणि साहित्यमूल्य |
| (2) द्विध्रुवात्मकतेचा सिद्धान्त | (6) सौंदर्यानुभव |
| (3) स्वरसरंजनात्मकतेचा सिद्धान्त | (7) सौंदर्यमीमांसा |
| | (8) सौंदर्य आणि साहित्य |
| (4) मानुषतेचा सिद्धान्त | (9) साहित्याचे तत्त्वज्ञान |

(A) 1–8, 2–6, 3–7, 4–5

(B) 1–8, 2–7, 3–6, 4–5

(C) 1–6, 2–8, 3–7, 4–9

(D) 1–6, 2–9, 3–8, 4–7

41. साहित्याच्या संदर्भात भाषेबाबत 'माध्यम' व 'साधन' हा भेद कोणी केला ?

(A) रा. भा. पाटणकर

(B) बाळ सीताराम मर्ढेकर

(C) प्रभाकर पाध्ये

(D) द. भि. कुलकर्णी

42. मराठीत कलानुभवाचा विचार करताना मेंदूच्या त्रिस्तरीय विभागणीचा आधार कोणी घेतला आहे ?

(A) माधव आचवल

(B) सुरेन्द्र बारलिंगे

(C) प्रभाकर पाध्ये

(D) गंगाधर पाटील

43. कालवाचक, स्थलवाचक, गतिवाचक, नियोज्यत्ववाचक, साधनवाचक, हेतुवाचक, विषयवाचक इत्यादी प्रकार कोणत्या अव्ययाचे केले गेले आहेत ?

(A) उभयान्वयी अव्यय

(B) शब्दयोगी अव्यय

(C) केवलप्रयोगी अव्यय

(D) क्रियाविशेषण

44. संयुक्त क्रियापदे कशास म्हणतात ?

(A) ज्या क्रियावाचक विकारी शब्दांनी वाक्यार्थास पूर्णता येते त्यांस

(B) ज्या मूळ शब्दास काही विकार होऊन म्हणजे त्यांस काही प्रत्यय लागून क्रियापदे बनतात त्यांस

(C) धातूंच्या विकृत रूपांस म्हणजे धातूंपासून तयार झालेल्या वाक्यांतील पदांस

(D) धातूंच्या काही विशेष कृदन्तांपुढे काही धातूंची आख्यातरूपे येऊन जी क्रियापदे बनतात त्यांस



www.StudentBounty.com

StudentBounty.com



45. 'त्याने भावाला बोलावले' हा प्रयोग कोणता ?

(A) प्रधानकर्तृक कर्मणी

(B) प्रधानकर्तृक भावी

(C) गौणकर्तृक भावी

(D) गौणकर्तृक कर्मणी

46. विभक्ती व कारकार्थ यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| (1) तृतीया | (5) संप्रदान |
| (2) चतुर्थी | (6) अपादान |
| (3) पंचमी | (7) अधिकरण |
| (4) सप्तमी | (8) करण |
| | (9) कर्म |

(A) 1–6, 2–7, 3–5, 4–9

(B) 1–9, 2–8, 3–6, 4–7

(C) 1–7, 2–5, 3–8, 4–6

(D) 1–8, 2–5, 3–6, 4–7

47. विधानपूर्णतेसाठी ज्या शब्दांची मूल विधेयास आवश्यकता नसते, अशा मूल विधेयास उद्देशून येणाऱ्या शब्दांस काय म्हणतात ?

(A) समानाधिकरण

(B) उद्देश्यविस्तार

(C) विधेयविस्तारके

(D) अप्रत्यक्ष कर्म

48. वृत्तपत्रातील वृत्तकथनाच्या बाबतीत सर्वांत योग्य विधान कोणते ?

(A) कथनात नाट्यमयता अत्यावश्यक असते

(B) वृत्तात वस्तुनिष्ठ प्रसंगकथन महत्त्वाचे असते

(C) संथ गतीने केलेले वृत्त निवेदन आकलनसुलभ असते

(D) वृत्तकथनकाराने स्वत:चे मतप्रतिपादन करावे

49. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक खात्याच्या सचिवांना पत्र लिहिताना कोणता मायना वापरावा ?

(A) सांस्कृतिक सचिव
स.न.

(B) तीर्थरूप सांस्कृतिक सचिव
सा. न. वि. वि.

(C) प्रिय सांस्कृतिक सचिव
स. न. वि. वि.

(D) आदरणीय सांस्कृतिक सचिव
सा. न. वि. वि.

50. पुढीलपैकी कोणता घटक जाहिरात लेखनाशी संबंधित **नाही** ?

(A) कल्पकता

(B) निरीक्षण शक्ती

(C) अतिरंजित दावा

(D) ग्राहकांच्या मानसशास्त्राचे भान



www.StudentBounty.com

StudentBounty.com

ROUGH WORK



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**ROUGH WORK**



www.StudentBounty.com